# महाराष्ट्र शासन

## सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

## नागरिकांची सनद

## २० फेब्रुवारी २०२६

**सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**नागरिकांची सनद**

**प्रस्तावना**

माजी सैनिकांचे आणि त्यांच्या अवलंबितांचे कल्याण ही केंद्र शासनाची आणि राज्य शासनाची संयुक्त जबाबदारी आहे. तथापि, महाराष्ट्रातील माजी सैनिक व त्यांच्या अवलंबीतांच्या बहुतांश समस्यांचे समाधान राज्य शासनामार्फत केले जाते. महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबित यांचे कल्याणार्थ सैनिक कल्याण विभागांतर्गत ३० जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये, ०३ संयुक्त कार्यालये आणि ०३ जिल्हा सैनिक कल्याण कक्ष कार्यरत आहेत.

महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय हा केंद्रबिंदू मानून शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या सेवा व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करताना पारदर्शकता, कामाप्रति निष्ठा, कालमर्यादा, कामाचा दर्जा, कार्यक्षमता राखण्याबरोबरच शासकीय सेवा पुरविण्या संदर्भात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभागामार्फत तथा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांबाबतची माहिती " नागरिकाची सनद" या माध्यमातून प्रकाशित करण्यात येत आहे.

या विभागाची भूमिका, कार्य विषयक माहिती, विभागांतर्गत सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, लागणारा कालावधी, सेवा विहित कालावधीत पुरविण्यात आल्या नाहीत तर कोणाकडे संपर्क साधावा त्या अधिकाऱ्यांची पदनामे देण्यात आली आहेत. यात नमूद केल्यानुसार विहित कालावधीत आवश्यक सेवा माजी सैनिक व त्यांचे कुटुबियांना निश्चित कालमर्यादेत उपलब्ध होतील, याची जबाबदारी सैनिक कल्याण विभागाची आहे.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **विभागाची सर्व साधारण माहिती** | |
| १ | सैनिक कल्याण विभागाचा संक्षिप्त इतिहास | १-२ |
| २ | सैनिक कल्याण विभागाची संरचना | ३ |
| ३ | सैनिक कल्याण विभाग व जिल्हा सैनिक कार्यालयाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या | ४-६ |
| ४ | माजी सैनिकांची व्याख्या | ७-९ |
| ५ | माजी सैनिक/विधवा/अवलंबितांना ओळखपत्र देण्याची प्रक्रिया | १० |
| ६ | माजी सैनिकांची रोजगार पटावरील नोंदणी | १० |
| ७ | सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना | ११-१३ |
| | (अ) पुनर्वसन महासंचालनालय, नवी दिल्ली | |
| | (ब) केंद्रिय सैनिक मंडळ, नवी दिल्ली | |
| | (क) राज्य शासनाच्या सवलती/योजना | |
| | (ड) सैनिक कल्याण विभागाच्या कल्याणकारी निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना | |
| | (इ) सैनिक कल्याण विभागाच्या विशेष निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना | |
| | (ई) छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | |
| ८ | सैनिक कल्याण विभागाकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवा त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, कालावधी व सेवा पुरविणारा अधिकारी इत्यादि. | १३-३२ |

# विभागाची सर्व साधारण माहिती

## १. सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त इतिहास

१.१ दिनांक ०१ जानेवारी १९१४ ते दुसरे महायुद्ध (सप्टेंबर १९४५) पर्यंतच्या काळात, ब्रिटिश भारतीय सैन्यातील बहुतेक सैनिक भारतीय ग्रामीण पार्श्वभूमी असलेले आणि पूर्वी सशस्त्र दलात सेवा दिलेल्या कुटुंबांतील होते. पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिश सरकारने ७ सप्टेंबर १९१९ रोजी सैनिक कुटुंबे असलेल्या जिल्ह्यांमध्ये "डिस्ट्रीक्ट सोल्जर्स, सेलर्स ॲण्ड एअरमन बोर्ड" ची स्थापना केली. तसेच सेवारत, निवृत्त आणि मृत भारतीय सैनिक, गैर-लढाऊ आणि त्यांच्या अवलंबितांचे हितसंबंध जोपासण्यात मदत करण्यात आली.

१.२ १९४७-४८ च्या जम्मू-काश्मीर ऑपरेशन्सनंतर, युद्धात अपंग, जखमी आणि मृत्युमुखी पडलेल्या सैनिक तथा त्यांच्या विधवांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता भासू लागली या दृष्टीने सन १९५१ मध्ये सेना मुख्यालयात एक कक्ष स्थापन करण्यात आला. दुसऱ्या महायुद्धादरम्यान नौदल आणि हवाई दलाच्या सतत विस्तारामुळे, तिन्ही सेवांच्या संदर्भात समान कार्ये करण्यासाठी एकाच संघटनेची आवश्यकता भासू लागली, परिणामी १९४४ मध्ये मंडळाची पुनर्रचना करण्यात आली. मार्च १९५१ मध्ये त्याचे नाव बदलून इंडियन सोल्जर्स, सेलर्स ॲण्ड एअरमन बोर्ड असे ठेवण्यात आले.

१.३ कालपरत्वे इंडियन सोल्जर्स, सेलर्स ॲण्ड एअरमन बोर्डचे (केंद्रीय, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय कार्यालयांचे) जे विविध नामकरण करण्यात आले ते खालीलप्रमाणे :-

| बदलाचा दिनांक | केंद्रीय | राज्य | जिल्हा |
|---|---|---|---|
| मार्च १९५१ | इंडियन सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड | स्टेट सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड | डिस्ट्रिक्ट सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड |
| नोव्हेंबर १९७५ | केंद्रीय सैनिक बोर्ड | राज्य सैनिक बोर्ड | जिल्हा सैनिक बोर्ड |
| नोव्हेंबर १९८३ | - | सैनिक कल्याण विभाग | जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय |

१.४ आजरोजी महाराष्ट्र शासन, सैनिक कल्याण विभागांतर्गत ३० जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये, ०३ संयुक्त कार्यालये आणि ०३ कक्ष खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यरत आहेत.

| अ. क्र | जिल्हा | कार्यालये | विश्रामगृहे | मुलांचे वसतिगृह | मुलींचे वसतिगृह | लॉन/हॉल |
|---|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये** | | | | | | |
| १ | मुंबई शहर | ०१ | ० | ० | ० | ० |
| २ | मुंबई उपनगर | ०१ | ० | ०१ | ०१ | ० |
| ३ | ठाणे | ०१ | ०१ | ०१ | ० | ० |
| ४ | रायगड | ०१ | ०४ | ०१* | ० | ० |
| ५ | रत्नागिरी | ०१ | ०२,०२* | ०१, ०२* | ०१ | ० |
| ६ | सिंधूदुर्ग | ०१ | ०१,०१* | ०१ | ० | ० |


| अ. क्र | जिल्हा | कार्यालये | विश्रामगृहे | मुलांचे वसतिगृह | मुलींचे वसतिगृह | लॉन/हॉल |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | पुणे | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ८ | सातारा | ०१ | ०१ | ०२,०१* | ०१ | ०१ |
| ९ | सांगली | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| १० | कोल्हापूर | ०१ | ०१ | ०१,०१* | ०१ | ०१ |
| ११ | सोलापूर | ०१ | ०२ | ०२,०१* | ०१ | ० |
| १२ | नाशिक | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ० |
| १३ | आहिल्यानगर | ०१ | ०२ | ०३ | ०१ | ०१ |
| १४ | धुळे | ०१ | ०१ | ०१* | ० | ०१ |
| १५ | जळगाव | ०१ | ०१,०१* | ०१ | ०१* | ०१ |
| १६ | नागपूर | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ० |
| १७ | वर्धा | ०१ | ० | ० | ०१* | ० |
| १८ | चंद्रपूर | ०१ | ० | ० | ० | ० |
| १९ | भंडारा | ०१ | ० | ० | ० | ० |
| २० | छ. संभाजीनगर | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ० |
| २१ | बीड | ०१ | ० | ०२ | ० | ० |
| २२ | धाराशिव | ०१ | ०१ | ०१ | ० | ० |
| २३ | लातूर | ०१ | ० | ०१ | ०१ | ० |
| २४ | जालना | ०१ | ० | ०१* | ० | ०१ |
| २५ | परभणी | ०१ | ० | ० | ० | ० |
| २६ | अमरावती | ०१ | ०१* | ०१ | ०१ | ० |
| २७ | अकोला | ०१ | ०१* | ०१ | ०१ | ० |
| २८ | यवतमाळ | ०१ | ०१ | ० | ०१* | ० |
| २९ | बुलढाणा | ०१ | ०१ | ०१* | ०१* | ०१* |
| ३० | वाशिम | ०१ | ० | ० | ० | ० |
| **संयुक्त कार्यालये (०३)** | | | | | | |
| १ | ठाणे - पालघर | ०१ | ० | ० | ० | ० |
| २ | धुळे- नंदूरबार | ०१ | ० | ० | ० | ० |
| ३ | परभणी- नांदेड | ०१ | ०१# | ०१# | ० | ० |
| **कक्ष (०३)** | | | | | | |
| १ | गडचिरोली | ०१ | ० | ० | ० | ० |
| २ | गोंदिया | ०१ | ० | ० | ० | ० |
| ३ | हिंगोली | ०१ | ० | ० | ० | ० |
| * तात्पुर्त्या स्वरूपात बंद. | | | | | | |
| # आस्थापना परभणी मधुन सांभाळली जाते. | | | | | | |

१.५ संपूर्ण वर्षभर राज्यातील सामान्य नागरिक तथा सर्व शासकीय कर्मचारी यांच्याकडून ऐच्छिक दानामार्फत संकलित केलेल्या सशस्त्र सेना ध्वजदिन निधीतून सैनिक कल्याण विभाग व त्यांचा अधिपत्याखालील येणाऱ्या कार्यालयामार्फत कल्याणकारी योजना राबविल्या जातात. ध्वजदिन निधीतील ६० टक्के हिस्सा कल्याणकारी योजना व ४० टक्के हिस्सा विशेष निधीत वर्ग करून राज्यातील माजी सैनिक, विधवा व त्यांच्या अवलंबितावर खर्ची टाकला जातो. **टीप** : उपरोक्त माहिती केंद्रीय सैनिक बोर्डाकडून प्रकाशित KSB Handbook २०२५ मधून घेण्यात आली आहे.


सैनिक कल्याण विभाग, पुणे

२.	**सैनिक कल्याण विभागाची संरचना**. सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य अंतर्गत विविध शाखेतील संघटनात्मक परस्परसंबंध व जिल्हा पातळीवरील कार्यालये खालील तक्त्यात रेखाटले आहेत:-

## सैनिक कल्याण विभाग संरचना




## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाची संरचना




**टिप** :- प्रत्येक कक्षात १ अशासकिय कल्याण संघटक व १ अशासकिय लिपिक पदे आहेत.

३. **कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

(अ) **सैनिक कल्याण विभागाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

३(अ).१. केंद्रीय सैनिक बोर्डाच्या सचिवांनी सोपवलेली कर्तव्ये पार पाडणे तसेच केंद्र आणि राज्य सरकारांनी विहित केलेल्या नियम आणि सूचनांनुसार, वार्षिक तपासणीसह, राज्यातील सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांचा कारभार पाहणे, त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे आणि समन्वय साधणे.

३(अ).२. राज्यातील माजी सैनिक/सैनिक विधवा यांना राज्य शासनाच्या आरक्षण धोरणानुसार रिक्त जागा भरल्याची खात्री करणे.

३(अ).३. माजी सैनिकांसाठी मेळाव्यांचे आयोजन करुन शासनाच्या विविध योजनांचा प्रचार करणे व माजी सैनिक/अवलंबीत यांच्या समस्यांचे निवारण करणे/मार्गदर्शन करणे. माजी सैनिक/सैनिक विधवा यांना शासनाच्या स्वयंरोजगार प्रकल्पाबाबत माहिती देऊन त्याच्या लाभासाठी योग्य ते मार्गदर्शन/सहाय्यता करणे.

३(अ).४. सशस्त्र दलामध्ये सेवारत असताना वीरगती प्राप्त सैनिकांच्या कुटूंबीयांना तसेच माजी सैनिक / सैनिक विधवा यांच्यासाठीच्या कल्याणकारी व पुनर्वसनाच्या विविध योजनांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करणे.

३(अ).५. देशातील सशस्त्र दलांविषयी सामान्य जनतेला माहिती देणे व त्यांच्यामध्ये सशस्त्र दलांविषयी आवड वाढवण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविणे.

३(अ).६. मा. राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली एकत्रित विशेष निधीची बैठक आयोजित करणे. तसेच मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सैनिक बोर्डाच्या वार्षिक बैठकीचे आयोजन करणे. सदर बैठकांमध्ये कल्याण आणि पुनर्वसना बाबत आढावा घेणे, नवीन धोरणे तयार करुन त्यांची अंमलबजावणी करणेबाबत निर्णय घेण्यात येतात.

३(अ).७. विशेष निधीची देखभाल करणे आणि या निधींच्या व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार राज्यात या निधीतून कल्याणकारी योजना राबविणे.

३(अ).८. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांची वार्षिक तपासणी करणे.

३(अ).९. सैनिक कल्याण विभाग / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामध्ये सेवारत माजी सैनिक व त्यांचे अवलंबित यांना वेतन आणि भत्त्यांसाठी ६०% केंद्रीय वाटा मिळवून देणे.

(ब) **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाची कर्तव्य व जबाबदाऱ्या.**

३(ब).१. सशस्त्र दलातील सेवारत सैनिक, माजी सैनिक/ सैनिक विधवा पत्नी व सामान्य नागरीक यांच्यामध्ये सदिच्छेची भावना वाढविण्यासाठी व टिकवून ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविने व त्यासाठी सतत प्रयत्न करणे.

३(ब).२. सशस्त्र दलातील सेवारत सैनिक/माजी सैनिक/त्यांच्या कुटुंबांच्या कल्याणावर लक्ष ठेवणे आणि स्थानिक प्रशासन किंवा संरक्षण अधिकाऱ्यांकडे त्यांचे खटले मांडण्यासाठी त्यांना मदत करणे.

**कल्याण संघटक**. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील माजी सैनिक/ सैनिक विधवा पत्नी यांचेशी समन्वय साधून त्यांच्या अडीअडचणी/तक्रारींची नोंद घेऊन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालया व्दारे त्यांच्या निवारणासाठी संबंधीत कार्यालयाशी योग्यतो पत्रव्यवहार करणे. तसेच शासनाकडून लागू केलेल्या कल्याणकारी व पुनर्वसनाच्या योजनांची जास्तीत जास्त माजी सैनिक/ सैनिक विधवा पत्नी यांना माहिती देउन लाभ मिळवून देण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन/सहाय्य करणे.

३(ब).३ देशातील सामान्य जनतेला सशस्त्र दलांविषयी तसेच त्यांच्या दलांमधील सेवेच्या अटी व शर्ती बद्दल माहिती देणे. सशस्त्र दलामध्ये काम करण्यास इच्छूक उमेदवारांना भरतीसाठीच्या ऑनलाईन पद्धतीचा प्रचार/प्रसार करणे.

३(ब).४ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या अखत्यारीतील निधीतून माजी सैनिक आणि त्यांच्या अवलंबितांना आर्थिक मदत देणे आणि माजी सैनिक व त्यांच्या अवलंबितांच्या प्रकरणांची सैनिक कल्याण विभाग तथा केंद्रीय सैनिक बोर्ड (KSB) यांचेकडील आर्थिक मदतीसाठी शिफारस करणे.

३(ब).५ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या (ZSWOs) जबाबदाऱ्यांमध्ये खालील कल्याणकारी बाबींचा समावेश असेल :-

(i) माजी सैनिक /विधवा / अवलंबीत पाल्य यांच्या पेन्शन संदर्भात संबंधित अभिलेखा कार्यालयाशी संपर्क साधुन समस्यांचे निराकरण करणे.

(ii) माजी सैनिक /विधवा / अवलंबीत पाल्य यांच्या जमीन आणि इतर वादांच्या संदर्भात संबंधित तहसील कार्यालयाशी संपर्क साधुन निराकरणासाठी मदत करणे.

(iii) सेवारत सैनिक कर्तव्यावर तैनात असताना गावी असणाऱ्या त्याच्या कुटूंबियांच्या समस्यांचे निराकरण करणे.

(iv) सैनिकांसाठीची विश्रामगृहे, मुला-मुलींचे वसतीगृहे यांची देखरेख करणे व ती सुस्थितीत चालु ठेवणे. तसेच माजी सैनिक/अवलंबीत यांचेसाठी व्यावसायिक व इतर प्रशिक्षणाबाबत माहिती देणे.

(v) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या अधिकारक्षेत्रातील न्यायालयीन प्रकरणांमध्ये महाराष्ट्र शासन व संरक्षण मंत्रालय (भारत सरकार) च्या केएसबी (KSB) चे प्रतिनिधित्व करणे, ज्यामध्ये या संस्थांना प्रतिवादी बनवले गेले आहे.

(vi) युद्ध विधवा/माजी सैनिक/सैनिक विधवा पत्नी/ अवलंबितांच्या पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने कार्यवाही करणे.

३(ब).६. जिल्हा सैनिक मंडळाचे अध्यक्ष (जिल्हाधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली सशस्त्र सेना ध्वज दिन संकलन कार्यक्रम आयोजित करणे आणि जिल्ह्यातील ध्वज दिन निधीच्या संकलन उदिष्टपुर्तीसाठी उपाययोजना करणे.

३(ब).७ माजी सैनिकांचे मेळावे/पुनर्मिलन कार्यक्रम आयोजित करणे. माजी सैनिक आणि विधवांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हा सैनिक मंडळाच्या अध्यक्षांसोबत कल्याणकारी बैठका आयोजित करणे.

३(ब).८ सैन्य भरती मेळावे यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करणे.

सैनिक कल्याण विभाग,पुणे

४) **<u>माजी सैनिकांची व्याख्या</u>**. (संदर्भ- के.एस. बी. गाईड बूक-२०२५)

४.१ माजी सैनिकांची व्याख्या डिपार्टमेंट ऑफ पर्सनल अॅण्ड ट्रेनिंग (डीओपीटी) यांनी दिलेल्या परिभाषाद्वारे केली जाते. खालील परिच्छेदांमध्ये माजी सैनिकांची व्याख्या व्यापकपणे वर्गीकृत केली गेली आहे.

४.२ **<u>०१ जुलै १९६८ पूर्वी सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या व्यक्ती.</u>** अशा व्यक्ति ज्यांनी भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात कोणत्याही हुद्यावर (लढाऊ किंवा गैर लढाऊ) सेवा केलेली आहे आणि त्या सेवेतून मुक्त झालेले असावेत, परंतु ते गैरवर्तन किंवा अकार्यक्षमते मुळे सेवेतून बडतर्फ झालेले नसावेत.

४.३ **<u>०१ जुलै १९६८ रोजी किंवा त्यानंतर परंतू ०१ जुलै १९७९ पूर्वी सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या सैनिकांसाठी.</u>** असा सैनिक ज्याने भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात कोणत्याही हुद्यावर (लढाऊ किंवा गैर लढाऊ) सलगपणे कमीत कमी सहा महीन्या पेक्षा जास्त सेवा करुन सेवेतून मुक्त झालेले असावेत, परंतु ते गैरवर्तन किंवा अकार्यक्षमते मुळे सेवेतून बडतर्फ झालेले नसावेत.

४.४ **<u>०१ जुलै १९७९ रोजी किंवा त्यानंतर परंतू ०१ जुलै १९८७ पूर्वी सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या सैनिकांसाठी.</u>** असा सैनिक ज्याने भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात कोणत्याही हुद्यावर (लढाऊ किंवा गैर लढाऊ) शपथविधी नंतर सलगपणे कमीत कमी सहा महिने सेवा केली असेल आणि त्यांना स्वेच्छा निवृत्तीच्या कारणाव्यतिरिक्त सेवा मुक्त केले असेल, परंतू आसाम रायफल्स, डिफेन्स सिक्युरिटी कॉर्पस, जनरल रिझर्व्ह इंजिनिअरिंग फोर्स, लोक सहाय्यक सेना आणि प्रादेशिक सेनेमध्ये सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी सेवा बजावलेली नसावी आणि

(अ) त्याच्या स्वतःच्या विनंतीशिवाय किंवा गैरवर्तन किंवा अकार्यक्षमतेमुळे बडतर्फी किंवा कार्यमुक्तीद्वारे मुक्त करण्यात आले आहे किंवा अशा मुक्ततेसाठी प्रलंबित राखीव दलात स्थानांतरित करण्यात आले आहे या व्यतिरिक्त किंवा

(ब) वर नमूद केल्याप्रमाणे राखीव दलात सोडण्यात किंवा स्थानांतरित होण्यास पात्र होण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवेचा कालावधी पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा बजावली आहे; किंवा

(क) संघाच्या सशस्त्र दलात पाच वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर त्याच्या स्वतःच्या विनंतीनुसार सोडण्यात आले आहे.

४.५ **<u>०१ जुलै १९८७ व त्यानंतर सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या सैनिकांसाठी.</u>** माजी सैनिक म्हणजे भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात (भूदल, नौदल, वायुदल) कोणत्याही हुद्यावर (लढाऊ किंवा गैर लढाऊ) सेवा केली आहे **आणि**

(अ) जो/जी अशा सशस्त्र दलाच्या सेवेतून निवृत्तीवेतन घेवून सेवानिवृत्त झाला/झाली आहे **अथवा**

(ब) जो/जी सशस्त्र सेनादलाच्या सेवेमुळे वैद्यकीय दृष्टीने अपात्र ठरुन सेवामुक्त झाला/झाली असेल व ज्याला/जिला वैद्यकीय किंवा इतर अपंगत्व निवृत्ती वेतन देण्यात आले आहे; किंवा

(क) ज्याला त्याच्या स्वतःच्या विनंतीशिवाय, आस्थापनेत कपात झाल्यामुळे अशा सेवेतून मुक्त करण्यात आले आहे, किंवा

(ड) सशस्त्र दलातून अतिरिक्त (सरप्लस) म्हणून जाहीर करुन सेवामुक्त करण्यात आला/आली असेल.

(इ) स्वतःच्या विनंतीखेरीज विशिष्ठ कालावधीचा सेवाकरार पूर्ण केल्यानंतर जी सेवामुक्त झालेली आहे. परंतु जिला गैरवर्तणूक अथवा अकार्यक्षमतेमुळे सेवेतून बडतर्फ वा कार्यमुक्त केलेले नाही व जिला सेवाउपदान देण्यात आलेले आहे, अशी प्रादेशिक सेनेतील खालील प्रवर्गात समाविष्ठ होणारी व्यक्ती :-

(अअ) अखंडित संनिविष्ठ सेवेचे निवृत्तीवेतन धारण करणाऱ्या व्यक्ती.

(अब) सैनिकी सेवेमुळे अपंगत्व आलेले व्यक्ती आणि

(अक) शौर्य पुरस्कार विजेत्या व्यक्ती.

४.६ **<u>०४ ऑक्टोबर २०१२ रोजी किंवा त्यानंतर सैन्य सेवेतून मुक्त केलेल्या सैनिकांसाठी.</u>** माजी सैनिक म्हणजे अशी व्यक्ती जी भारतीय संघ राज्याच्या नियमित सैन्य, नौदल आणि हवाई दलात लढाऊ किंवा गैर-लढाऊ म्हणून कोणत्याही पदावर सेवा बजावली आहे आणि

(अ) ज्याला स्वतःच्या विनंतीवरून किंवा नियोक्त्याने निवृत्तीवेतन मिळवल्यानंतर सैन्य सेवेतून निवृत्त केले आहे किंवा कार्यमुक्त केले आहे किंवा सेवामुक्त केले आहे; किंवा

(ब) ज्याला लष्करी सेवेमुळे किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे वैद्यकीय कारणास्तव अशा सेवेतून मुक्त केले आहे आणि त्याला वैद्यकीय किंवा इतर अपंगत्व निवृत्तीवेतन देण्यात आले आहे; किंवा

(क) ज्याला आस्थापनेत कपात झाल्यामुळे सैन्य सेवेतून मुक्त करण्यात आले आहे; किंवा

(ड) स्वतःच्या विनंतीखेरीज विशिष्ठ कालावधीचा सेवाकरार पूर्ण केल्यानंतर जी सेवामुक्त झालेली आहे. परंतु जिला गैरवर्तणूक अथवा अकार्यक्षमतेमुळे सेवेतून बडतर्फ वा कार्यमुक्त केलेले नाही व जिला सेवाउपदान देण्यात आलेले आहे, अशी प्रादेशिक सेनेतील खालील प्रवर्गात समाविष्ठ होणारी व्यक्ती :-

(अअ) अखंडित संनिविष्ठ सेवेचे निवृत्तीवेतन धारण करणाऱ्या व्यक्ती.

(अब) सैनिकी सेवेमुळे अपंगत्व आलेले व्यक्ती आणि

(अक) शौर्य पुरस्कार विजेत्या व्यक्ती.

(इ) **आर्मी पोस्टल सर्व्हिसचे** कर्मचारी जे लष्कराचा भाग आहेत आणि आर्मी पोस्टल सर्व्हिसमधून निवृत्तीवेतनासह त्यांच्या मूळ सेवेत परत न जाता निवृत्त झाले आहेत, किंवा लष्करी सेवेमुळे किंवा त्यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे सैन्यसेवा अथवा सैन्यकारणाने आलेल्या अपंगत्वामुळे निवृत्तीवेतनासह सेवामुक्त करण्यात आले आहे किंवा

(ई) १४ एप्रिल १९८७ पूर्वी सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी आर्मी पोस्टल सर्व्हिसमध्ये प्रतिनियुक्तीवर असलेले कर्मचारी; किंवा

(उ) वैद्यकीय कारणास्तव बाहेर काढलेले किंवा कार्यमुक्त केलेले आणि वैद्यकीय अपंगत्व निवृत्तीवेतन प्राप्त केलेले सैन्य प्रशिक्षणार्थी .

४.७ **शॉर्ट सर्व्हिस कमिशंड ऑफीसर** ज्यांच्या सेवेचा विहीत कालावधी ५ वर्षाचाच असतो. या ५ वर्षाच्या कालावधीनंतर ते सेवामुक्त झाले असतील तर ते माजी सैनिकाच्या दर्जास पात्र आहेत. तथापी, कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या ऑक्टोबर २०१२ च्या अधिसूचनेनुसार, जर एखाद्या शॉर्ट सर्व्हिस कमिशंड अधिकाऱ्याच्या सेवा नोंदींमध्ये असे दिसून येते की तो सेवा कालावधी पूर्ण झाल्यानंतर ग्रॅच्युइटीसह निवृत्त झाला आहे, तर एसएससी अधिकारी ईएसएम दर्जासाठी पात्र आहेत. तथापि, जर एसएससी अधिकारी पुढील सेवेसाठी पुन्हा नियुक्त झाला आणि पुन्हा नियुक्त कालावधी पूर्ण न करता निघून गेला, तर तो प्रारंभिक सेवा कालावधी पूर्ण करूनही ईएसएम दर्जासाठी पात्र नाही. शिवाय, जर त्याच्या सेवा नोंदी/मुक्तीच्या कागदपत्रांवरून तो स्वतःच्या विनंतीवरून अकाली निवृत्ती घेतली असेल तर तो शॉर्ट सर्व्हिस कमिशंड अधिकाऱ्याने कितीही वर्षे सेवा दिली असली तरी त्याला माजी सैनिकांचा दर्जा मिळू शकत नाही.

**टीप**:- १) **मिलिटरी नर्सिंग ऑफिसर्स (एमएनएस).** कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार मिलिटरी नर्सिंग ऑफिसर्स यांना माजी सैनिकांचा दर्जा देण्यात आलेला आहे.

२) **वैद्यकीयदृष्ट्या बोर्डेड आऊट कॅडेट्स** माजी सैनिक कल्याण विभागाच्या आयडी क्रमांक १२/१/२००५/डी (रेस) दिनांक ०२/०५ सप्टेंबर २०११ नुसार सक्षम अधिकाऱ्यांनी अपंग प्रशिक्षणार्थींना माजी सैनिक दर्जा देण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिलेली नाही.

**५) माजी सैनिक/माजी सैनिक विधवा यांना ओळखपत्र देणेबाबत.** माजी सैनिक/विधवा यांना केंद्र/राज्य शासनाच्या सेवा/सवलती उपलब्ध करुन देण्याकरीता माजी सैनिकाच्या व्याखेत बसत असलेल्या व्यक्तीस माजी सैनिकाचे ओळखपत्र तर सैनिक/माजी सैनिकाच्या मृत्युनंतर त्यांचे विधवा पत्नीस विधवांचे ओळखपत्र जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत देण्यात येते.

**६) माजी सैनिकांची नोकरीसाठी नोंदणी**

६.१ **आरक्षण**. भारतीय सैन्यदलामध्ये अनेकजण वयाच्या १८ ते २१ वर्षी प्रवेश करतात व सुमारे १५ ते २० वर्षे सेवा केल्यानंतर सेवानिवृत्त होतात. त्यावेळी त्यांचे वय सुमारे ३५ ते ४० वर्षाच्या दरम्यान असते. तारुण्याच्या ऐन उमेदित देशाच्या रक्षणासाठी सेवा केल्यानंतर नागरी जीवनात स्थायिक होण्याकरीता महाराष्ट्र व केंद्र सरकार त्यांना सर्वतोपरी मदत करीत असते. अशा माजी सैनिकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्यात, महामंडळात व तत्सम संस्थात वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये प्रत्येकी समांतर आरक्षणाअन्वये १५ टक्के जागा राखून ठेवल्या आहेत.

६.२ **रोजगार नोंदणी.** माजी सैनिकांना जि. सै. क. कार्यालयाच्या रोजगार पटावर नोंदणी करणे आवश्यक आहे. माजी सैनिकाने रोजगारासाठी नाव नोंदणी केल्यानंतर ती तीन वर्षासाठी वैध राहते. त्यानंतर माजी सैनिकांना या नोंदणीचे नूतणीकरण करणे गरजेचे आहे.

६.३ युध्दात/सैन्य सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियास शासकीय सेवेत वर्ग ३ व ४ पदावरिल माजी सैनिकांसाठी राखीव १५% आरक्षणा अंतर्गत भरतीकरीता सा.प्र.वि, शासन निर्णय क्र. आरटिए १०८२/३५०२/सी आर १००/१६अ दि. ०२ सप्टेंबर १९८३ नुसार प्राधान्य देण्यात येते.

सैनिक कल्याण विभाग,पुणे

**७) <u>सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना/कार्यक्रम</u>:-**

७.१ पुनर्वसन महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्या योजना:-

(अ) <u>माजी सैनिकांना पुनर्वसन प्रशिक्षण</u>. माजी सैनिक व सैन्य सेवेत असताना मृत्यु झालेल्या सैनिकांच्या पत्नी अथवा एका पाल्याला पुनर्वसनासाठी मान्यता प्राप्त पाठयक्रमासाठी विद्यावेतन जिल्हा सैनिक कार्यालयांमार्फत देण्यात येते.

(ब) युध्दात वीरगती प्राप्त सैनिकांचे अवलंबित/मोहिमेत अपंगत्व प्राप्त सैनिक/शौर्यपदक विजेता यांना गॅस एजेन्शी, पेट्रोल पंप, रॉकेल एजेन्शी करिता ८ टक्के आरक्षित जागासाठी पात्रता प्रमाण पत्र पुनर्वसन महासंचालनालयाकडून देण्यात येतात.

७.२ केंद्रिय सैनिक मंडळ, नवी दिल्ली यांच्याकडून माजी सैनिक, त्यांचे कुटुंबिय व सेवेत असणाऱ्या सैनिकांचे कुटुंबिय यांची काळजी वाहणे व त्यांना आवश्यक असलेले सहाय्य करणे इत्यादी कार्य पार पाडले जाते. तसेच केंद्रिय सैनिक मंडळामार्फत आर्मड फोर्सेस फ्लॅग डे फंड (AFFDF) / आर्मी सेंट्रल वेलफेअर फंड (ACWF)/RMDF मधून देण्यात येणाऱ्या विविध सवलतीबाबतची माहिती सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

७.३ **<u>राज्य शासनाच्या सवलती/योजना</u>**. महाराष्ट्र शासनाने माजी सैनिकांसाठी ज्या योजना घोषित केल्या आहेत त्या योजनांचा लाभ हा केवळ महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले माजी सैनिकांपुरत्याच मर्यादित आहेत. या कारणामुळे राज्य शासनाने घोषित केलेल्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतांना आवश्यक भासल्यास माजी सैनिकाच्या अधिनिवासाबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे मागितले जाते. शासन पत्र क्रमांक-सैकवि-१०००/२७२७/२८ दिनांक २४ नोव्हेंबर २००० नुसार एखादा माजी सैनिक महाराष्ट्राचा अधिनिवासी आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी पडताळणी करण्यात येते.

७.४ महाराष्ट्र राज्य सरकारच्या खालील योजना प्रामुख्याने सैनिक कल्याण विभागामार्फत राबविल्या जातात :-

(अ) युध्द किंवा युध्दजन्य मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या वारसांना त्यांचे अवलंबितांना सानुग्रह अनुदान महाराष्ट्रातील विरगती प्राप्त किंवा अपंगत्व आलेल्या सैनिकांना किंवा त्यांच्या अवलंबितांना मानाने जगता यावे म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात येतेः-

(अअ) दिनांक ०१ जानेवारी २०१९ पासून युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या अधिकारी/जवान यांच्या अवलंबितांना ०१ कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान त्यातमधून वीरपत्नीस ६० टक्के, वीरमाता २० टक्के व वीरपित्यास २० टक्के अनुदान विभागून दिले जाते.

सैनिक कल्याण विभाग, पुणे

(अब) दिनांक ०१ जानेवारी २०१९ पासून युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत देशाबाहेरील मोहिमेत १ टक्के ते २५ टक्के अपंगत्व आल्यास रूपये २० लाख, २६ टक्के ते ५० टक्के अपंगत्व आल्यास रूपये ३४ लाख आणि ५१ ते १०० टक्के अपंगत्व आल्यास रूपये ६० लाख सानुग्रह अनुदान दिले जाते. उपरोक्त अनुदानासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लाभार्थी व संरक्षण दलाकडून कागदोपत्री पुरावा मागवून प्रकरण सैनिक कल्याण विभागामार्फत शासनास मंजूरीकरीता सादर करण्यात येते.

(ब) **महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना.** सैन्य सेवेत असताना ज्या सैनिकांना शौर्यासाठी पदके/ पुरस्कार प्राप्त झाले त्यांच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गौरव पुरस्कार सुरु केले आहेत. या योजनेअंतर्गत परमवीर चक्र, महावीर चक्र, इत्यादी शौर्यपदके मिळविणाऱ्या तसेच उत्कृष्ठ सेवा बजावणाऱ्या सेवापदकधारक सैनिकांना शौर्यपदक/सेवा पदकानुसार रूपये ५० हजार ते रूपये ६० लाख पर्यंत रोख रक्कम देवून गौरवण्यात येते. धारातीर्थी पडलेल्या ज्या सैनिकांना मरणोपरांत पदक बहाल झालेले आहेत, अशा विरगती सैनिकांच्या वारसांना दरमहा रूपये २५००/- ते ३३,०००/- पर्यंत रक्कमेचे अनुदान वाटप करण्यात येते.

(क) **दुसरे महायुध्द अनुदान.** ज्या माजी सैनिकांनी दुसऱ्या महायुध्दात (सन १९३९ ते १९४५) मध्ये भाग घेतला व ज्यांना इतर कोणतेही निवृत्ती वेतन मिळत नाही अशा माजी सैनिकांना अथवा त्यांच्या विधवांना दरमहा रूपये ११,०००/- प्रमाणे अनुदान दिले जाते.

(ड) **सुवर्णमहोत्सवी योजना**. देशाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षापासुन दि. १५.०८.१९४७ ते ३०.०४.१९९५ कालावधीतील सानुग्रह अनुदान प्राप्त न केलेल्या व पुनर्वसन योजनेचा लाभ न घेतलेल्या विरगती प्राप्त जवानांच्या विधवांना/विरमाता विरपिता यांना रूपये ३०००/- अनुदान देण्यात येते.

(इ) उपरोक्त योजना व्यतिरिक्त शासकीय सेवेमध्ये वर्ग ३ आणि ४ च्या पदांसाठी १५ टक्के समांतर आरक्षण, पाल्यांसाठी शैक्षणिक प्रवेश, पुनर्वसनासाठी जमीन, निवासाठी भुखंड, गृहनिर्माण योजना, बंदुकीचा परवाना, स्वस्त धान्य दुकान/ रॉकेल विक्रीचा परवाना यामध्ये माजी सैनिकांना सवलती/प्राधान्य देण्यात आलेले आहे.

**७.५ सैनिक कल्याण विभागाच्या कल्याणकारी निधी/विशेष निधीमधून राबविल्या जाणाऱ्या योजना:-**

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात संकलित करण्यात येणारा निधी ध्वजदिन निधी म्हणून ओळखला जातो. या निधीचा ६० टक्के हिस्सा कल्याणकारी निधीत तर ४० टक्के हिस्सा विशेष निधीत वर्ग केला जातो. कल्याणकारी निधीचे व्यवस्थापन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्य सैनिक मंडळ व त्यास सहाय्य करण्यासाठी मा. मंत्री, माजी सैनिक कल्याण यांच्या अध्यक्षतेखालील राज्य सैनिक मंडळाची कार्यकारी समिती पाहते.

त्याच प्रमाणे विशेष निधीचे व्यवस्थापन मा. राज्यपाल यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या विशेष निधी (महाराष्ट्र) राज्य व्यवस्थापकीय समिती करीत असते. कल्याणकारी निधीमधून राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबतची माहिती विभागाचे www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. विशेष निधीतून मुख्यत्वे करुन माजी सैनिकांसाठी बांधण्यात आलेली ३३ विश्रामगृहे/माजी सैनिकांच्या मुलां/मुलीसाठी बांधण्यात आलेल्या एकूण ५२ वसतिगृहांच्यावर होणारा खर्च भागविला जातो.

**७.६ भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र (पीसीटीसी), नाशिक:-**

भरती पूर्व प्रशिक्षण संस्थेमध्ये संयुक्त सुरक्षा सेवा परीक्षा आणि एसएसबी मुलाखतीसाठी उमेदवारांना प्रशिक्षित केले जाते. संयुक्त सुरक्षा सेवा परीक्षेच्या तयारीसाठी ७५ दिवसांचे तर एसएसबी मुलाखतीसाठी १० दिवसांचे विनामुल्य प्रशिक्षण दिले जाते. यासाठी उमेदवाराने संयुक्त सुरक्षा सेवेच्या परीक्षेचा फॉर्म भरलेला असावा किंवा एसएसबी मुलाखतीसाठी उमेदवारांना कॉल लेटर प्राप्त झालेले असावे. अधिक माहितीसाठी उमेदवार www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर, pctcoic@yahoo.in ई-मेल अँड्रेसवर किंवा ०२५३-२४५१०३२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करू शकतात.

सैनिक कल्याण विभाग,पुणे